**MAHARASHTRA FILM, STAGE & CULTURAL DEVELOPMENT CORPORATION LIMITED**
**महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या**
(A Government of Maharashtra Undertaking)
( महाराष्ट्र शासनाचा उपक्रम )

**Dadasaheb Phalke Chitranagari (दादासाहेब फाळके चित्रनगरी ) गोरेगाव पूर्व, मुंबई**
Filmcity, Mumbai
https://filmcitymumbai.org

---

## चित्रनगरीमध्ये दादासाहेब फाळकेंच्या स्मृतींना उजाळा

---

## पुण्यतिथी निमित्ताने चित्रमहर्षी दादासाहेब फाळके यांना अभिवादन

16 फेब्रुवारी मुंबई : महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक दादासाहेब फाळके (Dadasaheb Phalke) यांच्या स्मृतिदिनी महामंडळाच्या आवारातील पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी महामंडळाचे अधिकारी-कर्मचारी, स्व.फाळके यांचे कुटुंबीय तसेच चित्रपट क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

दादासाहेबांच्या दूरदृष्टीने चित्रपट क्षेत्राची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि भारताला नवी ओळख मिळाली. आज दादासाहेब फाळके चित्रनगरी त्यांचा वारसा पुढे नेत आहे. आजच्या डिजिटल युगातदेखील दादासाहेब फाळके यांच्या कार्याचे महत्त्व कायम आहे. त्यांचा इतिहास, त्यांचा दृष्टिकोन आणि त्यांच्या कलेची प्रेरणा आजच्या चित्रकर्मींसाठी एक मौल्यवान ठेवा आहे. त्यांच्या या अमूल्य योगदानामुळेच भारतीय चित्रपट सृष्टीचा वारसा सतत समृद्ध होतो आणि तो पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहचवला जातो. हीच बाब लक्षात घेत आज चित्रनगरीत दादासाहेब फाळकेंच्या आठवणींना उजाळा देण्यात आला.